दाखल तारीख – ०२.१२.२०१९
नोंदणी तारीख – ०२.१२.२०१९
निकाल तारीख – २०.०४.२०२६
कालावधी – ०७ व.०२ म.१८ दि.

कुडाळ येथील दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), कुडाळ यांचे न्यायालयात
ता. कुडाळ, जिल्हा– सिंधुदुर्ग.
( पिठासीन अधिकारी – जी. ए. कुलकर्णी )

**फौजदारी किरकोळ अर्ज नं.११९/२०१९**
**निशाणी क्र.– ६१**

**सौ.उत्कर्षा उल्हास गावडे** }
**पूर्वाश्रमीची रेश्मा हरी गावडे** }
वय–४० वर्षे, धंदा–काही नाही } **...अर्जदार**
रा.द्वारा बाळकृष्ण हरी गावडे, }
आकेरी, पालववाडी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग }

**विरुध्द**

**उल्हास भगवान गावडे** }
वय–४६ वर्षे, धंदा–शेती व व्यापार } **...सामनेवाला**
रा.इन्सुली गावडेवाडी ता. कुडाळ,जि.सिंधुदुर्ग. }

---

अर्जदारतर्फे वकिल – श्री.ए.एस.सामंत
सामनेवालातर्फे वकिल – श्रीम.आर.के.खान

---

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख– २०.०४.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र पध्दती, रितिरिवाज व परंपरेनुसार दि.१८.०५.२००१ रोजी श्री.शंकर गावडे यांच्या इन्सुली, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथील घरी संपन्न झाला. सदर विवाहाची नोंदणी दि.०३.०६.२००१ रोजी ग्रामपंचायत इन्सुली तालुका–सावंतवाडी, यांचे कार्यालयात झालेली आहे. विवाहानंतर अर्जदार ही सामनेवाला सोबत नांदण्यासाठी त्यांच्या इन्सुली, गावडेवाडी ता.सावंतवाडी येथील घरी आली. त्यानंतर अर्जदार व सामनेवाले हे मुंबईस रहावयास गेले, मुंबईत चार वर्षे दोघांनी सुखाने संसार केला. अर्जदार व सामनेवाला यांनी मुल झाले नाही म्हणून वैद्यकीय तपासणी केली. अर्जदारास मुल न होण्या संदर्भात कोणताही दोष आढळून आला नव्हता. त्यानंतर अर्जदारच्या सासऱ्यांनी अर्जदार व सामनेवाला यांना फोन करून गावी बोलावून घेतले. त्यावेळी सामनेवाला यांची आई अर्जदारला 'वांझोटी' म्हणून हिणवू लागली व ''एवढी ट्रीटमेंट करूनही तुला मुल होत नाही, तु माझ्या मुलाला फसविले आहेस. या ट्रीटमेंटसाठी जो काही खर्च झालेला आहे तो तू तुझ्या वडीलांकडून घेवून ये'' असे बोलू लागली. सामनेवाल्याची आई अर्जदारला रात्रीच्या वेळी विष घालणेबाबत व विहीरीत ढकलून देण्याबाबत बोलत असे. तसेच सामनेवाला अर्जदारला बेदम मारहाण करायचा व मारताना अर्जदार ओरडली तर तिचे तोंडावर कापडाचा चोथा मारायचा. जेणेकरून अर्जदारचा आवाज बाहेरच्यांना ऐकू जावू नये. सामनेवाला व त्याच्या घरच्या माणसांनी अर्जदारचा शारिरीक व मानसिक छळ करण्यास सुरूवात केली. सामनेवाल्याच्या आईकडून अर्जदारला मिळू लागलेली वाईट वागणूक अर्जदारने सामनेवाल्यास सांगितली असता सामनेवाला आईचीच बाजू घेत असे व आईच्या चुकीच्या वागण्याकडे कानाडोळा करत असे.

तसेच त्या कारणावरून उलट अर्जदारलाच शिवीगाळी करत असे. तरीही सदरची बाब ही खाजगी व घरातील असल्याने ती समाजात जावून घरची इज्जत जावू नये म्हणून काही दिवस अर्जदार सदर बाब सहन करीत गप्पच राहिली. तिला सासूकडून व सामनेवाल्याकडून दिल्या जात असलेल्या छळच्या वागणुकीबद्दल अर्जदारने माहेरच्या माणसांना देखील कधी सांगितले नाही.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला हा कामावरून घरी आल्यावर सामनेवाल्याची आई त्याल्या अर्जदारबद्दल निष्कारण खोटेनाटे सांगत असे. त्यामुळे सामनेवाल्याने अर्जदारशी भांडण केले व ''आजारपणातून तु तुझे जेवण स्वत: बनवून खा' असे सांगितले. तसेच ''रोज रोज आमच्या घरात तू आल्यापासून भांडणे होत आहेत. त्यामुळे तु या घरात न राहिलेलीच बरी. त्यामुळे तु तुझ्या गावच्या सरपंच, पोलीस पाटील यांना घेवून ये. अन्यथा परत या घरी पाऊल ठेवू नकोस'' अशी धमकी दिली. अर्जदारने सामनेवाला व त्याच्या आईसमोर चुक नसल्याचे सांगून बाजू मांडण्याचा प्रयत्न केला असता ते दोघेही अर्जदारचे काहीच ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नसत. परंतु, तरीही सामनेवाला व त्याच्या आईच्या स्वभावात आज ना उद्या चांगला बदल होईल या आशेवर अर्जदार व सर्व काही सहन करीत राहिली.

४. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदार व सामनेवाला यांचे लग्न होवून सुमारे अठरा वर्षाचा कालावधी लोटला. अर्जदार हिस मुल व्हावे म्हणून अर्जदारने स्वत: पुढाकार घेवून स्वत:ची व सामनेवाल्याची सन २००२ साली तपासणी करून घेतली. त्यावेळी मुल न होण्यामागे अर्जदारच्या गर्भाशयात कोणताही दोष नाही असे डॉक्टरांनी सांगितली व सामनेवाला यास सहा महिन्याचा औषधांचा कोर्स करण्यास सांगितले. परंतु, सामनेवाला याने एक महिन्याचे आतच औषधे घेण्याचे बंद केले. त्यामुळे सामनेवाल्याच्या दोषामुळे अर्जदारला एकदाही दिवस

गेले नाहीत. परंतु अर्जदारला मुल होत नाही याचा सर्वतोपरी दोष अर्जदार हिला देवून अर्जदारची सासू, सासरे तसेच सामनेवाला यांनी अर्जदार हिस प्रचंड शारिरीक व मानसिक त्रास दिला. तसेच अर्जदारला वारंवार शिवीगाळ व मारहाण देखील केलेली आहे.

५. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदारचे वडील अर्जदारच्या घरी गेले असता, तेव्हाही सामनेवाल्याने अर्जदारशी भांडण केले. त्यावेळी अर्जदारच्या वडीलांनी भांडण सामंजस्याने मिटविण्याचा प्रयत्न केला असता ''तुम्ही माझया घरी थांबू नका व परत कधीही इथे येवू नका'' असे म्हणून अर्जदारच्या वडीलांवर काठी उगारली. परंतु, मुलीच्या घरी भांडण वाढत जावू नये याचा विचार करून अर्जदारचे वडील त्याबाबत कोठेही तक्रार न करता घरी आकेरी येथे निघून आले.

६. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदारची माहेरची माणसे आकेरी गावचे सरपंच, पोलीस पाटील, प्रतिष्ठीत इसम श्री.काका पडते यांचेसह इन्सुली येथे सामनेवाल्याच्या घरी सामंजस्याने वाद मिटविण्यासाठी गेले. त्यावेळी तेथे सामनेवाल्याच्या इन्सुची गावचे पोलीस पाटील व सरपंच हे त्याठिकाणी हजर होते. त्यावेळी समानेवाला व त्याची आई अर्जदारवर ओरडली व म्हणाली की,''तुला यांना इथे आणायला कोणी सांगितले ?'' तसेच सामनेवालाची आई अर्जदारला शिवीगाळी करू लागली. सामनेवाला यांचे वडीलांनी सामनेवालाचे आईस गप्प रहायला सांगितले. परंतु ती कुणाचेही काही ऐकुन न घेता शिवीगाळी करीतच राहिल्याने तिला तिच्या पतीने खोलीमध्ये ठेवते. तरीदेखील ती खोलीच्या पाठीमागच्या दरवाज्याने घरात पुन्हा आली व अर्जदारला शिव्या देवू लागली. सामनेवाला देखील आपल्या आईस ''आई तू इकडे येवू नकोस'', असे म्हणाला तसेच अर्जदारला म्हणाला की, ''तुझे आई वडील सुध्दा इथे येता कामा

नये, तु तुझ्या माहेरीच जावून रहा. माझी आई मेल्यानंतरच मी तुला न्यायला येणार. तोपर्यंत तू इथे येवू नकोस''. तरीदेखील अर्जदार तेथे सर्वकाही छळजाच सहन करीत तेव्हापासून ४ वर्षे राहिली. परंतु, अर्जदारचा छळजाच काही कमी झाला नाही. सामनेवाला व त्याच्या आईने अर्जदारशी जेवणखानावरून भांडणतंटे सुरू ठेवले. अर्जदारला जेवण देण्यास बंद केले. अर्जदारला सदर कालावधीत २–३ दिवस तिची जाऊ जागृती जितेंद्र गावडे हिने जेवण दिले. त्यानंतर अर्जदार स्वत: वेगळे जेवण बनवून २ महिने राहिली. सदर कालावधीत भातशेतीची कामे अर्जदारकडून सामनेवाले व त्याच्या आईने माहे नोव्हेंबर सन २०१६ मध्ये ''आम्हाला तुझी गरज नाही, तू येथून पुढे आमच्या घरात राहू नकोस, तु तुझ्या माहेरी निघून जा, पुन्हा माघारी येवू नकोस. आलीस तर तुझ्या जिवाचे काही खरे नाही'' अशी धमकी दिली व मारहाण केली व घराबाहेर काढले. सामनेवाला व त्याची आई ही बोलल्याप्रमाणेच खरे करणारे आहेत याची जाणीव आधीपासूनच अर्जदारला असल्याने अर्जदार सामनेवाला यांच्या घरातून भितीपोटी नाईलाजास्तव एकटीच माहेरी निघून आली व आजही माहेरीच तिला रहावे लागत आहे.

**७.** अर्जदार पुढे असे कथन करते की, त्यानंतर कधीही सामनेवाला अगर त्याच्या घरच्या माणसांपैकी कोणीही अर्जदारची साधी विचारपूस, चौकशी देखील केली नाही. तसेच तिच्या पोटापाण्याच्या प्रश्नाबाबतही कोणतीच तरतुद केली नाही. त्यामुळे अर्जदार ही माहेरच्या माणसांच्या आश्रयाखाली व त्यांच्यावर अतिरिक्त बोजा बनून राहणे भाग पडलेले आहे. अर्जदारच्या माहेरची परिस्थिती अतिशय गरीबीची व हलाखीची असून त्यांनाचा त्यांचा रोजचा चरितार्थ चालविणे अवघड होवू बसलेले आहे. परंतु, माहेरी राहण्यावाचून अन्य कोणताच मार्ग नसल्याने अर्जदारला माहेरी रहावे लागलेले आहे.

८. अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला यांनी दि.१८.०९.२०१९ रोजी वकिलांमार्फत अर्जदार हिस नोटीस पाठविली. सदर नोटीसीतील सर्व मजकुर खोटा व खोडसाळ आहे. अर्जदार सामनेवाला सोबत नांदावयास येणेकरिता सामनेवाला याने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. सामनेवाला यांस अर्जदार ही केवळ घरातील व शेतीची कामे करणारी मोलकरीण बाई म्हणून राबवून घेतले व यापुढेही तसेच वागावयाचे आहे. सामनेवाला हा फक्त त्याच्या आई वडीलांचेच सांगणे ऐकत असे व तो सांगतील तेच खरे मानून वागत असे. सामनेवाला याचे नोटीसीचे वाचन करता सामनेवाला यास घटस्फोटच हवा आहे याकरिता सामनेवाला याने ही नोटीस पाठविण्याचा खटाटोप चालविलेला आहे. सामनेवाला यास अर्जदार हीस नांदावयाचे असते तर अशाप्रकारची नोटीस सामनेवाला याने अर्जदार हिस पाठविली नसती.

९. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदारची माहेरची स्थिती अत्यंत बेताचीच आहे. अर्जदार तेव्हापासूनच ती त्याचे भावाकडे आश्रीतासारखीच रहात आहे. अर्जदारचे भावाचा केवळ शेती हाच व्यवसाय आहे. त्यापासून त्याला तुटपुंजेच उत्पन्न मिळते. त्यावर त्याची पत्नी व त्याची दोन मुले व वृध्द आई अशी माणसे अवलंबून आहेत. उलटपक्षी सामनेवाला यांची भरपूर शेती व माड बागायत आहे. तसेच त्याचा भेडल्या माडाची पाने विकण्याचा मोठा व्यवसाय आहे. या धंद्याकरिता त्याचेजवळ गडी माणसे कामास आहेत. सदर धंद्यापासून त्याला खर्च वजा जाता निव्वळ दिवसाकाठी सुमारे रू.४०००/– एवढे उत्पन्न मिळते. तसेच त्यांची २५ माडाची लागती झाडे आहेत. सामनेवाला याचे महिन्याकाठी सर्व खर्च वजा जाता सुमारे ८०,०००/– (रूपये ऐंशी हजार मात्र) चे उत्पन्न आहे. तर अर्जदार जवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही स्वत:हून कमावण्यास असमर्थ आहे. अर्जदारला केलेल्या मारहाणीमुळे अर्जदार ही मानसिकरित्या

व शारीरिकरित्या पूर्णत: खंगलेली व भेदरलेली आहे. त्यामुळे सद्यपरिस्थितीत ती कोणताही कामधंदा करू शकत नाही. यावरून सामनेवाला हा आर्थिक दृष्टया सधन व सक्षम असूनही अर्जदारच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजांची पूर्तता करण्याची कायदेशीर जबाबदारी सामनेवाल्याने झटकलेली आहे ही बाब स्पष्ट होत आहे. अर्जदारच्या मुलभूत गरजांची पूर्तता वेळचे वेळी करणे ही जबाबदारी सामनेवाल्यास कायद्यान्वये झटकता येणार नाही. सबब अर्जदार हिला सामनेवाला याचेकडून पोटगी मिळणेकरिता अर्ज दाखल करावा लागत आहे.

**१०.** प्रस्तुत अर्जास सामनेवाला याने निशाणी १२–अ वर म्हणणे मांडून अर्जदार हिचा सदरचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकूर सामनेवाला यास मान्य व कबूल नसल्याने प्रस्तूतचा अर्ज सामनेवाला याने नाकारला आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने केलेले आरोप हे गलीच्छ असून, ते धादांत खोटे व खोडसाळ आहेत. सामनेवाला व अर्जदार यांचा विवाह हा हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे दि.१८.०५.२००१ रोजी पार पाडला. सदरचा विवाह हा सामनेवाला व अर्जदार यांच्या एकमेकांच्या संगनमताने व घरच्या मंडळींच्या संमत्तीने व आशीर्वादाने संपन्न झालेला आहे. त्यानंतर अर्जदार ही सामनेवाला याच्या घरी नांदावयास गेली. त्यावेळी सामनेवाला याच्या घरी त्याचे व्यतिरिक्त त्याचे आई–वडील राहत होते. अर्जदार हिने विवाहानंतर सुरूवातीचे काही महिने त्याच्या घरात चांगल्या प्रकारे राहून चांगली वर्तणूक केली व चांगला संसार केला.

**११.** सामनेवाला पुढे असे कथन करतो की, सामनेवाला हा लग्नापूर्वीपासूनच मुंबई येथे राहत असल्याची कल्पना त्याने अर्जदार व तिच्या घरच्या मंडळींना दिलेली होती. सामनेवाला कामासाठी मुंबई येथे गेल्यानंतर अर्जदार हिने तिचे खरे रूप दाखविण्यास सुरू केले. अर्जदार ही सामनेवालाच्या वृध्द आईवडीलांशी क्षुल्लक कारणावरून मोठमोठयाने भांडण करणे व त्यांना

शिवीगाळ करणे, घरात कोणालाही न सांगता वरचेवर माहेरी निघून जाणे, सामनेवाला याच्या आई–वडीलांना घालून पाडून बोलणे, त्यांचा पदोपदी अपमान करणे, सामनेवाला याच्या आईवडीलांची कोणत्याही प्रकारे सेवासृश्रुषा न करणे, घरातील दैनंदिन कामे न करणे व जेवण न बनविणे वगैरे असे प्रकार सुरू केले. त्यावेळी सामनेवाल्याला असे वाटले की, तो मुंबई येथे गेल्याने अर्जदार हिस गावातील त्याच्या घरात एकटे रहावे लागत असल्याने तिची चिडचिड होत असले. म्हणून तो स्वत: गावी येवून अर्जदार हिच्या अशा स्वभावात बदल होईल या अपेक्षेने अर्जदार हिस त्याच्यासोबत मुंबई येथे राहण्यास घेवून गेला. त्यावेळी मुंबई येथे अर्जदार व सामनेवाला असे दोघेच राहत होते. अर्जदार ही सामनेवालासोबत सुमारे वर्षभर मुंबई येथे राहिली. सुरूवातीचे काही दिवस अर्जदार ही सामनेवालाशी चांगली वागली. त्यानंतर अर्जदार ही 'मला तुझ्याबरोबर येथे रहावयाचे नाही, मला आत्ताच माहेरी नेवून सोड'' असा सामनेवालाकडे सतत तगादा लावला. सामनेवाला याने अर्जदारला अतिशय संयमाने व शांतपणे अर्जदार हिस खूप समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्जदार मात्र मोठया प्रमाणात कोणत्याही प्रकारचा विचार न करता त्याला मानसिक व शारिरीक त्रासच देवू लागली.

१२. सामनेवाला पुढे असे कथन करतो की, अर्जदार हिच्या अशा प्रकारच्या क्रुर वागणुकीस खुप कंटाळला व सामनेवाला याने त्याचे मुंबईतील काम सोडून अर्जदार हिस घेवून कायमस्वरूपी गावी राहण्यास आला. सामनेवाला याची आई वृध्द वयोमानपरत्वे तिला झेपत नसतानाही सर्व घरातील कामे करीत होती. अर्जदार ही प्रत्येकवेळी सामनेवाला यास ''तुझ्यात कमतरता असल्याने आपणास मूल होवू शकत नाही''असे सांगून त्याचा पाणउतारा करून त्याला बडबडु लागली व पुढे अर्जदार हिला सामनेवालासोबतच बिलकूल रहावयाचे नाही असे सांगून

त्याला मनस्ताप देत होती. सामनेवाला हा अर्जदार हिला दोघेही चांगल्या डॉक्टरकडे जावून ट्रीटमेंट घेवूया असे सांगत असे. परंतु अर्जदार ही प्रत्येकीवेळी नकार देत असे. एकेदिवशी सामनेवाला याने अर्जदार हिला ट्रीटमेंटसाठी नेले व ट्रीटमेंट सुरूही केली. परंतु ती ट्रीटमेंट अर्जदार हिने मुद्दामहून अर्धवट सोडून दिली. अर्जदार हिला गर्भपिशवीचा त्रास होत होता त्यावेळी सामनेवाला याने तिला तेथीलच डॉक्टरकडे नेवून तिची तपासणी करून घेतली. त्यावेळी तिच्या गर्भपिशवीमध्ये गाठी असल्याचे झाल्याचे निदान झाले. त्यावेळी सामनेवाला याने लगेच तेथील डॉक्टरांकडून अर्जदार हिच्या गर्थपिशवीचे ऑपरेशन करून घेतले व अर्जदारच्या गर्भपिशवीतील गाठी काढण्यात आल्या. सामनेवाला याने अर्जदार हिचेकडे कधीही दुर्लक्ष केलेले नाही.

१३. सामनेवाला पुढे असे कथन करतो की, सामनेवाला याने अर्जदार हिचेसोबत सन २०१२ पर्यंत कसाबसा संसार केला. त्यानंतर एके दिवशी अर्जदार हिने सामनेवाला याचेशी व त्याच्या आईवडीलांशी खूप मोठयाने भांडण करून व त्यांना घाणेरडया भाषेत शिवीगाळ करून सामनेवाल्याच्या घरातून ती तिच्या माहेरी निघून गेली. सामनेवाला व त्याच्या आई वडीलांनी अर्जदार हिस खूप समजाविण्याचे प्रयत्न केले. परंतु अर्जदार ही कोणाचेही कोणतेच बोलणे न ऐकला रागारागाने ती तिच्या माहेरी निघून गेली. त्यानंतर सामनेवाला व त्याच्या नातेवाईकांनी अर्जदार हिच्या माहेरी वेळोवेळी जावून तिला समजाविले. त्यावेळी अर्जदार ही सामनेवाला याचे घरी नांदण्यास आली. त्यानंतर पुन्हा एकदा अर्जदार हिने माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये अशाच प्रकारे सामनेवाला याचेशी व त्याचे आईवडीलांशी भांडण करून ती तिच्या माहेरी सामनेवाला यास काहीही न सांगता निघून गेली. अर्जदार हिने सामनेवाला याचेशी चांगला मनापासून संसार केला नाही. सामनेवाला माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये पुन्हा एकदा त्याच्या नातेवाईकांना घेवून

अर्जदार हिच्या माहेरी तिला घरी नांदण्याकरिता आणण्यास गेला. त्यावेळी अर्जदार व तिचे माहेरची मंडळी तसेच तिच्या माहेरच्या गावातील पोलीस पोटील व सरपंचही उपस्थित होते.

**१४.** सामनेवाला पुढे असे कथन करतो की, सामनेवाला हा अर्जदार हिच्या वागणुकीत व स्वभावात भविष्यात कोणता न कोणता बदल होईल व अर्जदार ही सामनेवालासोबतच त्याची पत्नी म्हणून घरी नांदावयास येवून त्याच्याबरोबर चांगला संसार करील या वेडया आशेवर सामनेवाला हा आजही जगत आहे. सामनेवाला याने अर्जदार हिला घरी नांदणेस आणण्यासाठी वेगवेगळया पध्दतीने प्रयत्न केले. सामनेवाला याने अर्जदार हिचेबरोबरच विवाहसंबंध संपुष्टात आणून घटस्फोट मिळणेकरिता ओरोस येथील मे.दिवाणी न्यायाधीशसाहेब (व.स्तर ) यांचे कोर्टात मॅरेज पिटीशन नं.१९८/२०१९ हे दाखल केलेले असून ते न्यायप्रविष्ट आहे.

**१५.** सामनेवाला पुढे असे कथन करतो की, सामनेवाला याने अर्जदार हिचा कोणत्याही प्रकारे मानसिक अगर शारीरिक छळ केलेला नाही किंवा तसा त्रासही दिलेला नाही. अर्जदार हिच्या माहेरच्या मंडळींच्या सततच्या अर्जदार व सामनेवाला यांच्या संसारामध्ये ढवळाढवळ करीत असल्यानेच सामनेवाला यास अर्जदार हिच्या बरोबरच्या संसारापासूनच वंचित रहावे लागत आहे.

**१६.** सामनेवाला पुढे असे कथन करतो की, अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असताना तिला आवश्यक असणारा सर्व खर्च व तिच्या पोटापाण्याची व कपडालत्त्याची वेळोवेळी सोय केलेली आहे. अर्जदार हिचेमुळे सामनेवाला याने मुंबईतील काम सोडुन गावी येवून राहवे लागले आहे. सामनेवाला याचे वडील हे हृदयविकाराच्या आजाराने मयत झाले असून मयत होण्यापूर्वी त्यांचेवर सुमारे चार वर्षे औषधोपचाराचा खर्च हा सामनेवाला याने अनेक ठिकाणातून कर्ज घेवून

केलेला आहे. सामनेवाला यास अन्य कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार ही कुडाळ येथील लाडु फॅक्टरीत कामाला जाते व त्याचेपासून तिला दरमहा रक्कम रूपये ४,०००/– ते रूपये ५,०००/– पर्यंत पगार मिळतो. तसेच अर्जदार हिचे आकेरी गावात दोन घरे असून शेत जमीन, लागते माड सुमारे ३० ते ३५, लागते काजू सुमारे १५० अशी मोठी बागायत आहे. अर्जदार हिस वार्षिक सुमारे रूपये ३,००,०००/– ते रूपये ४,००,०००/– एवढे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार हिस कोणत्याही प्रकारे पोटापाण्यासाठी व कपडालत्त्यासाठी तसेच अन्य गरजांसाठी सामनेवाला याचेकडून अंतरिम पोटगीची, कायमची पोटगी व अर्जाचा खर्च मागण्याची कोणतीही आवश्यकता नाही. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करून सामनेवाला यास या ना त्या मार्गाने मानसिक व शारिरीक त्रास देण्याच्या इराद्यानेच प्रस्तुतचा खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

**१७.** अर्जदार व सामनेवालातर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**१८.** अभिलेखावरील दाखल कागपत्रांचे अवलोकन केले असता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आलेले असून त्याचे कारणमिमांसासह उत्तर पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार या स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ आहे असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| २. | सामनेवाला यांना उत्पन्नाचे पर्याप्त व सबळ साधन आहे असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | सामनेवाला यांनी अर्जदार यांच्या भरण पोषणास नकार दिला किंवा दुर्लक्ष केले असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ४. | अर्जदार या सामनेवाला यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १५,०००/- इतकी पोटगी मिळणेस पात्र असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**१९.** अर्जदार हिचे वतीने पुढीलप्रमाणे साक्षीदार तपासले असून निशाणी क्र.४९ लगत पुरशीस देवून तिचा पुरावा बंद केलेला आहे.

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | अर्जदार (स्वत:) | १९ |

**२०.** अर्जदार हिने तिचे अर्जातील कथने शाबीत करणेकरिता पुढीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे.

| **अनु.क्र.** | **कागदपत्रके** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | सर्व्हे नं.१ हिस्सा नं.१२ चा सातबारा उतारा | ५० |
| २. | खाते क्र.६६१ चा ८अ उतारा | ५१ |
| ३. | मा.दिवाणी न्यायालय (व.स्तर) सिंधुदुर्ग–ओरोस यांचेकडील विवाह अर्ज क्र.१९८/२०१९ मधील न्यायनिर्णयाची सहीसूद नक्कल | ५९ |
| ४. | मा.दिवाणी न्यायालय (व.स्तर) सिंधुदुर्ग–ओरोस यांचेकडील विवाह अर्ज क्र.१९८/२०१९ मधील हुकुमनाम्याची सहीसूद नक्कल | ६० |

२१. सामनेवाला याने त्याचे वतीने पुढीलप्रमाणे साक्षीदार तपासले असून निशाणी क्र. ५४ लगत पुरशीस देवून त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | सामनेवाला (स्वत:) | ५२ |

२२. सामनेवाला यांनी त्यांचे अर्जातील कथने शाबीत करणेकरिता पुढीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे.

| अनु.क्र. | कागदपत्रके | निशाणी |
|---|---|---|
| १. | सर्व्हे नं.६ हिस्सा नं. २४ चा सातबारा उतारा | ३६ |
| २. | सर्व्हे नं.८, हिस्सा नं.५ चा सातबारा उतारा | ३७ |
| ३. | सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.३ चा सातबारा उतारा | ३८ |
| ४. | सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.६ चा सातबारा उतारा | ३९ |
| ५. | सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.८ चा सातबारा उतारा | ४० |
| ६. | सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.९ चा सातबारा उतारा | ४१ |
| ७. | सर्व्हे नं.१५, हिस्सा नं.१० चा सातबारा उतारा | ४२ |
| ८. | सर्व्हे नं.२३१ हिस्सा नं. ९ चा सातबारा उतारा | ४३ |
| ९. | गावमौजे आकेरी येथील आठ 'अ' उतारा | ४४ |

## –::– **कारणमिमांसा** –::–

**मुद्दा क्र.१ करीता:–**

२३. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केलेला असलेमुळे त्याअंतर्गत नमुद असणारी दाद मिळणेकरिता अर्जदार हिने ती स्वत:चे भरण पोषण करणेस असमर्थ असल्याचे, सामनेवाला यांचेकडे उत्पन्नाचे पर्याप्त साधन असल्याचे,

सामनेवाला यांनी अर्जदार यांचे भरण पोषाणास नकार दिल्याचे व सामनेवाला यांनी तिचा कोणत्याही संयुक्तिक कारणाविना त्याग केल्याचे सिध्द करणे अत्यंत जरुरीचे आहे.

**२४.** अर्जदार यांनी त्यांचे कथनाचे पृष्टयर्थ निशाणी १९ वर साक्षीदार क्र. १ म्हणून स्वतःची साक्ष नोंदविलेली आहे. त्यांनी त्यांचे साक्षीदरम्यान त्यांच्या अर्जातील कथनांचा पुनरूच्चार केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, त्यांचे कथनानुसार सामनेवाला यांनी त्यांचा मानसिक व शारीरिक छळ केला असल्याने त्यांना नाईलाजास्तव माहे नोव्हेंबर २०१६ पासून त्यांचे माहेरी रहावे लागत आहे. सामनेवाला यांनी अर्जदार यांच्या कपडेलत्त्याची अथवा औषधपाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. अर्जदार यांचे साक्षीचे अवलोकन केले असता, सामनेवाला यांनी त्यांना दोन तोळयाचे मंगळसूत्र, एक मुहूर्तमणी व दोन ग्रॅमची अंगठी असा अलंकार लग्नाचेवेळी केलेला असून तो सर्व त्यांच्या ताब्यात आहे. त्यांनी त्यांचे सासू सासरे व सामनेवाला यांनी केलेल्या शारीरिक व मानसिक छळाबाबत कधीही पोलीस स्टेशनला अथवा महिला तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दिली नाही. त्यांचे नावे मौजे आकेरी येथे समाईकात शेतजमीन असून त्याचे सातबारा उतारे निशाणी ३६ ते ४४ वर दाखल आहेत. सामनेवाला यांनी त्यांना दि.१८.०९.२०१९ रोजी नांदणेस येणेबाबत नोटीस पाठविलेली असून, त्यास त्यांनी उत्तर न देता प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

**२५.** सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे अर्जदार या माहे नोव्हेंबर २०१६ पासून त्यांचे माहेरी राहत असून त्यांनी स्वत: कोणत्याही संयुक्तिक कारणाविना सामनेवाला यांचा त्याग केलेला आहे. जर अर्जदार यांना सामनेवाला यांचेसोबत संसार करणेची इच्छा असती तर अर्जदार यांनी सामनेवाला यांना नांदणेस नेणेबाबत नोटीस पाठविली असती अथवा

न्यायालयामध्ये दाद मागितली असती. परंतु, अर्जदार यांनी तशी कोणतीही नोटीस सामनेवाला यांना पाठविली नाही. त्यामुळे अर्जदार यांना सामनेवाला यांचेसोबत संसार करावयाचा नसल्याने अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती सामनेवालातर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केली. याउलट, सामनेवाला यांनी अर्जदार यांना दि.१८.०९.२०१९ रोजी नोटीस पाठवून अर्जदार यांचेसोबत नांदणेस इच्छा व्यक्त केली. त्यास अर्जदार यांनी नकार दिल्याचे दिसून येते. याउलट, अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे जरी सामनेवाला यांनी दि.१८.०९.२०१९ रोजी अर्जदार यांना नांदणेस येणेबाबत नोटीस पाठविली असली तरीही सामनेवाला यांनी मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ओरोस यांचे न्यायालयामध्ये विवाह अर्ज क्र.१९८/२०१९ चा विवाह विच्छेदनाचा अर्ज अर्जदार यांचेविरूध्द दाखल केलेला आहे. यावरून सामनेवाला यांना अर्जदार यांचेसोबत कोणतेही नातेसंबंध ठेवणेची इच्छा नसल्याचे स्पष्ट होते. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार यांचा त्याग केलेनंतर अर्जदार हिची कोणत्याही उदरनिर्वाहाची तरतुद सामनेवाला यांनी केली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केली.

**२६.** अभिलेखावरील दाखल साक्षी पुराव्यांचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवालातर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार या माहे नाव्हेंबर २०१६ पासून त्यांचे माहेरी राहत असल्याचे अर्जदार यांनी कथन केलेले आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे अर्जदार यांनी निशाणी १८ वर दाखल केलेल्या त्यांचे मत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, त्या माहे फेब्रुवारी २००५ पासून सामनेवाला यांचेपासून विभक्त राहत असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेली कथने चुकीची आहेत. अभिलेखावरील दाखल अर्जदार व सामनेवाला यांचे साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले असता,

अर्जदार हया सामनेवाला यांचेपासून विभक्त राहत असलेची बाब अर्जदार व सामनेवाला यांनी मान्य केली असल्याचे दिसून येत आहे.

२७. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे दाखल अर्जाचे कामी अर्जदार या त्यांचे स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ आहेत का हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे सामनेवाला यांनी अर्जदार यांची कोणतीही उदर भरणाची अथवा औषधपाण्याची अथवा पालनपोषणाची कोणतीही तरतुदी केली नसल्याचे दिसून येत आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे अर्जदार यांच्या नावे शेत मिळकती असून त्यातून त्यांना उत्पन्न प्राप्त होते. तसेच अर्जदार हया खाजगी नोकरी करत असून त्यातून त्यांना दरमहा ५,०००/– ते ७,०००/– इतका पगार मिळत असतो. त्यामुळे अर्जदार हया त्यांचे भरण पोषण करणेस समर्थ आहेत. याउलट, अर्जदार यांचे कथनाप्रमाणे सामनेवाला कथन करतात त्या मिळकतींमध्ये अर्जदार यांचे नाव समाईकात नमूद असून त्या मिळकतींमधून अर्जदार यांना कोणतेही उत्पन्न प्राप्त होत नाही. तसेच अर्जदार या सातवी पर्यंत शिकलेल्या असून त्यांना कोणतीही खाजगी नोकरी मिळणे शक्य नाही. त्यामुळे सामनेवाला कथन करतात त्या सर्व बाबी चुकीच्या आहेत.

२८. **अ– भारतीय पुरावा कायदा कलम १०३** –विशिष्ट तथ्यासंबंधीचा शाबितीचा भार कोणत्याही एखादया विशिष्ट व्यक्तीवर राहील असा कोणत्याही कायदयाने उपबंध केलेला नसेल तर, जी व्यक्ती न्यायालयाला त्या तथ्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करील तिच्यावर त्या तथ्याच्या शाबितीचा भार राहील.

**ब– भारतीय पुरावा कायदा कलम १०४** – पुरावा स्वीकार्य होण्यासाठी शाबित करावयाचे तथ्य शाबित करण्याचा भार – जे कोणतेही तथ्य कोणत्याही व्यक्तीला अन्य एखादया

तथ्याबद्दल पुरावे देणे शक्य व्हावे म्हणुन शाबित करण्याची जरुरी असते ते शाबित करण्याचा भार असा पुरावा देवु इच्छीणाऱ्या व्यक्तीवर असतो.

२९. भारतीय पुरावा कायदयातील वर नमूद तरतुदींचा विचार करता, एखाद्या व्यक्तीस एखादी घटना माहिती असेल, अथवा माहिती असलेली बाब शाबीत करणेकरिता अन्य पुराव्याची गरज असेल त्यावेळी तशी माहिती असलेली व्यक्ती न्यायालयासमोर आणून त्यांचेकडून एखादी घटना शाबीत करून घेणे गरजेचे असल्याचे दिसून येत आहे. कौंटुबिक वाद हे पती व पत्नी यांचे वैयक्तिक माहिती मधील असणारी बाब आहे. त्यामुळे पती अथवा पत्नी यांनी त्यांना माहिती असलेली बाब पुराव्याआधारे सिध्द करणेची जबाबदारी ज्याचे त्याचे वर असल्याचे वरनमूद तरतुदींवरून दिसून येत आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे सिध्द करणेकरिता सबळ पुरावा सादर करणे अपेक्षित असून त्यांचे माहितीमधील बाब त्यांनी सिध्द करणे गरजेचे आहे. परंतु, सामनेवाला यांनी तसा कोणताही पुरावा अभिलेखावर आणला नसल्याचे दिसून येत आहे.

३०. सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी अर्जदार यांना नांदणेस येणेकरिता दि.१८.०९.२०१९ रोजी नोटीस पाठविली होती. त्यास अर्जदार यांनी उत्तर न देता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु, सामनेवाला यांनी सदर नोटीशीस अनुसरून अर्जदार यांचेविरूध्द नांदणेस येणेकरिता मा.न्यायालयात अर्ज अथवा दावा दाखल केला नसल्याचे अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्यांवरून दिसून येत आहे. याउलट, सामनेवाला यांनी अर्जदार यांचेविरूध्द मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात विवाह अर्ज क्रमांक १९८/२०१९ चा विवाह विच्छेदनाचा अर्ज दाखल केला असल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज

मा.न्यायालयाने नामंजूर केलेला आहे. यावरून सामनेवाला यांनी अर्जदार यांचा कोणत्याही संयुक्तिक कारणाविना त्याग केला असल्याचे व अर्जदार या स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ असल्याची बाब अर्जदार यांनी सिध्द केली असल्याचे दिसून येत आहे.

**३१.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सामनेवाला यांची शेतजमीन असल्याची बाब त्यांनी त्यांचे निशाणी ५२ वरील साक्षीदरम्यान कबूल केले असल्याचे दिसून येते. सामनेवाला यांचे कथनानुसार इन्सुली गावी त्यांच्या नावे जवळपास ६६ जमिनी असून त्यामध्ये सामनेवाला यांचा समाईकात हिस्सा आहे. तसेच त्या मिळकतीमधून त्यांचे दैनंदिन खर्च सुरू असल्याचे त्यांनी कथन केलेले आहे. यावरून सामनेवाला यांचे उत्पन्न असल्याची बाब सिध्द होत आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे त्यांना किडनीचा व बीपीचा त्रास असून त्यामुळे ते कोणतेही दैनंदिन कामकाज करण्यास असमर्थ आहेत. परंतु, सामनेवाला यांनी त्यांचे साक्षीदरम्यान कथन केल्याप्रमाणे ते कोणतेही काम करू शकत नाहीत असा दर्शविणारा कोणताही कागद अथवा वैद्यकीय अधिकारी यांचा दाखल त्यांनी अभिलेखावर सादर केलेला नाही. यावरून सामनेवाला हे त्यांचे दैनंदिन कामकाज करण्यास व अर्जदार यांचे पालनपोषण करण्यास समर्थ असल्याचे दिसून येत आहे. या सर्व विवेचनांचा एकत्रित विचार करता अर्जदार या त्यांचे भरण पोषण करण्यास असमर्थ असल्याचे व सामनेवाला यांचेकडे पर्याप्त व सबळ साधन असल्याची बाब सिध्द करत असून सामनेवाला यांनी अर्जदार यांची भरणपोषणाची कोणतीही तरतुदी केली नसल्याचे देखील अर्जदार यांनी सिध्द केले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर '***होकारार्थी***'नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता:**–

३२. कोणतीही स्त्री तिला सासरी चांगली वागणुक मिळत असेल तर ती स्वेच्छेने आपला संसार मोडुन माहेरी राहणे पसंत करणार नाही, ती आपला संसार सुखाचा होणेकरिता सासरी होणारा छळ सहन करते. अगदी अशक्य झाल्यानंतरच ती सासरच्या लोकांविरुध्द दाद मागण्याकरिता पोलीस स्टेशन व न्यायालयात जाऊन तिचा छळ होऊ नये व तिला व्यवस्थित नांदविण्यात यावे याचा प्रामाणिक प्रयत्न करत असते, तोच प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिने केल्याचे दिसुन येते.

३३. सामनेवाला हे अर्जदार यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी पार पाडत नसल्याचे दिसून येते. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत आर्थिक दिलासा आदेशाची व्याप्ती खुप मोठी असुन त्यामध्ये व्यथित व्यक्तीस झालेले नुकसान, वैद्यकीय खर्च, पोटगी या बाबीचा समावेश होतो. सदरचे आदेश देताना केलेली आर्थिक मदत ही योग्य, वाजवी, उचित आणि व्यथित व्यक्तीच्या राहणीमानाशी सुसंगत असणे गरजेचे आहे. अर्जात नमुद परिस्थितीप्रमाणे पोटगी म्हणुन योग्य अशी रक्कम अर्जदाराला देता येते. अभिलेखावरील दाखल निशाणी १८ वरील अर्जदार हिचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, ती सध्या पालववाडी आकेरी येथे राहणेस असून सामनेवाला हा इन्सुली येथे राहणेस आहे. त्याला ४०,०००/– इतके उत्पन्न व्यवसायातून मिळत असते. तसेच अर्जदार यांचे कथनाप्रमाणे सामनेवाला यांचे स्वत:चे राहते घर व शेतजमीन देखील आहे. त्यातून त्याला वार्षिक ८०,०००/– इतके उत्पन्न प्राप्त होत आहे. तसेच निशाणी क्र.१६ वरील सामनेवाला यांचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, तो मोलमजुरी करत असून त्याला

मासिक रक्कम रूपये ८,०००/– इतके उत्पन्न मिळते. तसेच सदर प्रतिज्ञापत्रातील अन्य मजकुराचे अवलोकन केले असता, त्याचेवर विविध स्वरूपाचे कर्ज व वैद्यकीय तसेच जीवनावश्यक खर्च असल्याचे देखील त्याने नमूद केलेले आहे. यावरून सामनेवाला यांना मासिक उत्पन्न प्राप्त होत असल्याचे दिसून येते. परंतु सामनेवाला यांनी त्यांचे वर नमूद निशाणी १६ वरील प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद खर्चांची व कर्जांची माहिती दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच सदर प्रतिज्ञापत्रातील नमूद उत्पन्न व खर्च याचा तुलनात्मकरित्या विचार केला असता, त्यामध्ये मोठी तफावत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या अर्जातील मजकुर नाकारण्याच्या उद्देशाने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर न करता सामनेवाला यांनी सदरचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

**३४.** अभिलेखावरील दाखल सामनेवाला यांचे निशाणी ५२ वरील दिलेल्या साक्षीपुराव्यामध्ये कथन केल्याप्रमाणे त्यांचेवर कर्ज परतफेडीची जबाबदारी असल्याची बाब सामनेवाला यांनी सिध्द केलेली नाही. तसेच सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे त्यांना दरमहा कर्जाचे कामी, वैद्यकीय तपासणी व औषधांकरिता आर्थिक खर्च येत असतो. परंतु सदर कथनाचे पृष्टयर्थ सामनेवाला यांनी अभिलेखावर कोणताही पुरावा सादर केलेला नाही. याउलट, अर्जदार यांचे कथनाप्रमाणे त्यांचे कोणतेही उत्पन्न नाही, तसेच सामनेवाला यांनी त्यांना कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही, असे सामनेवाला यांनी त्यांचे साक्षीदरम्यान मान्य केलेले आहे. त्यामुळे अभिलेखावरील दाखल वर नमूद साक्षीपुराव्यांवरून अर्जदार हिचे राहणीमान व सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती पाहता अर्जदार यांना सदर कलमाअंतर्गत आर्थिक दिलासा देत असताना

अर्जदार या प्रतिमहा रक्कम रुपये ३,०००/– पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ चे उत्तर '***अंशतः होकारार्थी*** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ५ करिता:–**

**३५.** वर नमूद कारणमिमांसेचा एकत्रित विचार करता सामनेवाला यांनी अर्जदार यांचे पालनपोषणाची कोणतीही तरतुद केली नसल्याने अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज न्यायालयात दाखल करावा लागला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून पती या नात्याने सामनेवाला याने अर्जदार हीस रक्कम रुपये ५,०००/– देणे न्यायोचित ठरते. करिता मुद्दा क्र.५ चे उत्तरादाखल पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः खर्चासह मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांना सामनेवाला यांनी दरमहा पोटगी रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी तीन हजार रुपये मात्र) अर्ज दाखल तारखेपासुन प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत देण्यात यावी असा आदेश करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत अर्जाचे खर्चापोटी सामनेवाला यांनी अर्जदार यांना रक्कम रुपये ५,०००/–(अक्षरी पाच हजार रुपये फक्त) देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना विनामुल्य पुरविणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

[ जी.ए. कुलकर्णी ]

दिनांक–२०.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.